| MHGA120000062026 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :- | ०६.०३.२०२६ |
| | नोंदणी तारीख | :- | ०६.०३.२०२६ |
| | निकाल तारीख | :- | १३.०३.२०२६ |
| | कालावधी | :- | ००वर्षे,००महिना,०५दिवस |
| | **निशाणी क्रमांक ०३ सलग** | | |

**भाग ''अ''**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i)}**

| | | |
|---|---|---|
| | **कोरची येथील ग्राम-न्यायालयात, जिल्हा-गडचिरोली**<br>**पिठासीन अधिकारी : एन.पी. देशपांडे**<br>**न्यायाधिकारी, ग्राम-न्यायालय,कोरची** | |
| | **न्यायनिर्णय दिनांक १३ मार्च २०२६ रोजी** | |
| | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ०३/२०२६** | |
| | अपराध क्रमांक २५/२०२६, भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ पोलीस ठाणे कोरची, तालुका-कोरची, जिल्हा-गडचिरोली. | |
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासनतर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>कोरची, जिल्हा-गडचिरोली. |
| **अभियोग पक्षातर्फे** | विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री. ए.पी. नाकाडे | |
| **आरोपी** | | **नंदकिशोर मंन्साराम वरखडे,**<br>वय:- ३८ वर्षे, धंदा - वाहन चालक,<br>राहणार- कोरची, तालुका- कोरची,<br>जिल्हा-गडचिरोली. |
| **आरोपीतर्फे** | | आरोपी स्वत: हजर |

**भाग ''ब''**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii)}**

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | २४.०२.२०२६ |
| पहिली खबरीची तारीख | २४.०२.२०२६ |
| दोषारोपत्राची तारीख | ०६.०३.२०२६ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | १३.०३.२०२६ |

| | |
|---|---|
| जबाब नोंदणी सुरू झाल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३.०३.२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असल्यास | --- |

## आरोपीचा तपशील :

| आरोपीचे स्थान | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील गुन्हे | निर्दोष मुक्त अथवा शिक्षा | लादलेली शिक्षा | खटल्याची प्रकिया सुरू असतांना आरोपी न्यायाधीनबंदी असल्याचा फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ प्रमाणे सुट मिळण्यासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | **नंदकिशोर मंन्साराम वरखडे** | --- | --- | कलम २८५ भारतीय न्याय संहिता, २०२३ | दोषी ठरविण्यात आले. | दंड रक्कम रू.५००/-. | लागु नाही. |

## <u>भाग ''क''</u>

{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii)} सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन साक्षदारांची यादी

**अ. सरकारपक्ष :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**ब. बचाव, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | -निरंक.- | -निरंक.- |

**क. बचाव न्यायालयीन साक्षदार, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**ब. बचावपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | –निरंक.– | –निरंक.– |

**ड. महत्वाचे वस्तु :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

MHGA120000062026

**श्री. एन.पी. देशपांडे, न्यायाधिकारी, ग्राम–न्यायालय, कोरची यांचे न्यायालय**

१. अपराध घडल्याची तारीख व वेळ : २४.०२.२०२६ रोजीचे १७.०५ ते १७.१५ वाजता

२. माहिती/तक्रार प्राप्त झाल्याची तारीख व वेळ : २४.०२.२०२६ रोजीचे १९.५० वाजता.

३. तक्रारकर्त्याचे नांव, वय इ. : महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस ठाणे अंमलदार,
पोलीस ठाणे कोरची,
तहसिल–कोरची, जिल्हा–गडचिरोली.

४. आरोपीचे नांव, वय व पत्ता इ.– : **नंदकिशोर मंन्साराम वरखडे,**
वय:– ३८ वर्षे, धंदा – वाहन चालक,
राहणार– कोरची, तालुका– कोरची,
जिल्हा–गडचिरोली.

५. (अ) ज्याबद्दल फिर्यादी दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील–

**पहिले–** दिनांक २४.०२.२०२६ रोजीचे १७.०० वाजताच्या सुमारास कोरची येथील बस स्टॉप चौकात तुम्ही तुमचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र. एम एच २१ व्ही ८६१७ हे रस्त्याला अडथळा होईल असे उभे केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ अन्वये गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.03.13 18:16:37 +0530

(ब) कलम व अधिनियम – २८५ भारतीय न्याय संहिता
(क) मालमत्तेचे मुल्य – रूपये –––/–

(एन.पी. देशपांडे)
न्यायाधिकारी,
ग्राम–न्यायालय, कोरची.

दिनांक : १३/०३/२०२६.

६. आरोपीचे प्रतिकथन

प्र.१. – दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर – होय.
प्र.२. – तुम्हाला आता वाचून दाखविलेले आरोप समजले काय ?
उत्तर – होय.
प्र.३. – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर – होय मला गुन्हा कबुल आहे.

माझे समक्ष

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.03.13 18:16:34 +0530

____________________

आरोपीची सही/अंगठा

(एन.पी. देशपांडे)
न्यायाधिकारी,
ग्राम–न्यायालय, कोरची.

दिनांक : १३/०३/२०२६.

## <u>न्यायनिर्णय</u>

(दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी घोषित)

आरोपीविरूध्द भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ नुसार दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

२. आरोपी हा आज रोजी न्यायालयासमोर उपस्थित आहे. मी त्याचे विरूद्ध नि.क्र. ३ खाली दोषारोपाचा तपशिल तयार करून त्याला मातृभाषेत समजावून सांगितला असता त्याने त्याला गुन्हा कबुल असल्याचे मान्य केले आहे. त्याचबरोबर त्याने नि.क्र.२ खाली त्याला गुन्हा कबुल असल्याची पुरसिस दाखल केली आहे. त्यामुळे त्यांनी स्वताहुन गुन्हा कबुल केल्याचे निर्दशनास येते. त्यामुळे त्याला त्याने गुन्हा कबुल केल्यामुळे त्याचेविरूद्ध लावण्यात आलेल्या दोषारोपाबाबत दोषी ठरविण्यात येत आहे.

३. यावेळी मी आरोपीला शिक्षेबाबत ऐकण्यासाठी न्यायनिर्णय थांबवित आहे. आरोपीने त्याला विचारणा केली असता कमीतकमी दंडाची शिक्षा देण्याची विनंती केली. भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ प्रमाणे त्याला रक्कम रू. ५,०००/– पर्यंतच्या दंडाची शिक्षा जरी विर्निदीष्ट करण्यात आली असली तरी रस्त्यावरील अडथळ्याचे स्वरूप पाहता आरोपीला रक्कम रू. ५००/– चा दंड आकारणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **नंदकिशोर मंन्साराम वरखडे** याला भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ च्या दंडनिय अपराधास भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७५ अन्वये दोषी ठरविण्यात येवून त्याने त्यासाठी रक्कम रू. ५००/–(रक्कम रूपये पाचशे फक्त) दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते व त्याने दंड भरला नाहीतर दोन दिवस साध्या कैदेची शिक्षा भोगावयाची आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.03.13 18:16:28 +0530

(एन.पी. देशपांडे)
न्यायाधिकारी,
ग्राम–न्यायालय, कोरची.

दिनांक : १३/०३/२०२६